॥पाइयकव्वपहा॥

(प्राकृतकाव्यप्रभा)

Pāiyakavvapahā – A radiance of Prakrit Poetry
A very small compilation of selected Prakrit verses

Compilation and Marathi Translation : Master Devesh C. Shah.

English Translation : Miss Mrunmayee A. Patwardhan.

Proof-readers : Master Aamod M. Kelkar (Marathi)
: Miss Gauri Kolhe (English)

First Published On : February 11th, 2021. (Online)

दोन शब्द

कोणत्याही पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याचा एक प्रघात फार वर्षांपासून चालत आलेला आहे पण एका संकलनात्मक पुस्तकाला नक्की प्रस्तावनेची गरज आहे का हा एक प्रश्न मनात होता. तरीही या अत्यंत लहान अशा प्राकृत गाथांच्या संकलना मागील भूमिका येथे व्यक्त करतो.

जवळपास एक वर्षापूर्वी भारतात कोरोना महामारीचे आगमन झाले आणि राज्य व केंद्र सरकारने सुरक्षेचा उपाय म्हणून लॉक्डाऊन जाहीर केला व आपल्या सगळयांच्या जीवनाला एक वेगळीच दिशा मिळाली. सुरुवातीचे काही महिने घरात बसून काय करावे अथवा काय करता येईल यातच गेले. टी.व्ही.वरील बातम्या मानसिक स्वास्थ्याला बाधक होऊ लागल्या. त्यामुळे फेसबुक-व्हॉटसॅप् इत्यादी माध्यमांवर आपण सगळयांनी वेळ घालवला. याच दरम्यान इंटरनेट माध्यमांवर अनेक क्षेत्रातील अभ्यासु लोकांनी आपापल्या अभ्यास क्षेत्राशी निगडीत नेमकी आणि मोजकी माहिती प्रसारित करायला सुरुवात केली. त्यात विविध विषयांवरील लेखमाला-व्याख्यानमालांचा जणुकाही पूरच आला. इंटरनेटचे अस्तित्व जरी काही दशकांपासूनचे असले तरी या एका वर्षात भारतीयविद्याशाखा, भारतीय पुरातत्त्व, संस्कृत-प्राकृत-पालि भाषांसंबंधीची माहिती ज्या मोठ्या प्रमाणावर आणि अल्पकालावधीत उपलब्ध झाली याचा कदाचित आपण सगळयांनी स्वप्नातसुद्धा विचार केला नसणार. यालाच आपण भारताचे खरे इंटरनेटयुग असे म्हणू शकतो.

या विविध विषयांच्या माहितीचे आदान-प्रदान होत असतांना प्राचीन भाषांसंबंधी पाहिले असता इन्स्टाग्रामवर व तत्सम ठिकाणी संस्कृत क्षेत्रातील तरूण विद्वानांनी-भाषाप्रेमींनी दिवसाला एक असे काही निवडक श्लोक भाषांतरासह पोस्ट करण्याची सुरुवात केली. सहजच असे काही प्राकृत भाषेतील श्लोकांविषयी, ज्यांना प्राकृतात सामान्यपणे गाथा असे म्हणतात, कोणी पोस्ट करत आहे का हे जाणुन घेण्याची उत्सुकता निर्माण झाली परंतु अत्यल्प श्लोक मला फेसबुक वरील काही प्राकृत भाषाविषयीच्या ग्रुपवर दिसले. साहजिक भाषांतर हे हिंदी आणि इंग्रजी. ते पाहून मनाला काही समाधान होत नव्हते. एवढं प्रचंड लोकाभिमुख साहित्य असूनही या बद्दल कोणीच काही लिहू नये हे मला तरी नवल होते. कदाचित असेही होऊ शकते की मी चूकीच्या ठिकाणी शोधत असणार.

संस्कृत सहोदरा या प्राकृत भाषांचे साहित्य हा एक विलक्षण विचारांचा सांस्कृतिक ठेवा आपल्या सर्वांना लाभला आहे परंतु इतर प्राचीन भाषांच्या तुलनेत या प्राकृत भाषांचा अभ्यास आपल्या देशात हवा तेवढ्या मोठ्या प्रमाणावर होत नाही. आधुनिक भारतीय भाषांच्या विकासात प्राकृत भाषांचे योगदान हे मंदार-मेरू इतकेच महत्त्वाचे आहे. प्राकृत भाषा असे आपण साधारणपणे म्हणतो तेव्हा त्यात मागधी, अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, अपभ्रंश इ. भाषांचा समावेश होतो. इ.स. पूर्व ६व्या शतकापासूनचे साहित्य यात उपलब्ध आहे. अनेक प्राचीन भारतीय शिलालेखांची भाषा ही प्राकृत आहे. प्रस्तरावर उत्कीर्ण शिलालेखातील प्राकृत भाषेत आणि साहित्यिक प्राकृतात किंचित् आपल्याला फरक दिसतो.

जनसामान्यांची ही भाषा आणि जनसामान्यांच्या जीवनाचे दर्शन घडवणारे हिचे साहित्य, पण हिंदी आणि इंग्रजी भाषेत अधिकांश पुस्तक इंटरनेट आर्काईव्ह या वेबसाईटवर उपलब्ध आहेत, मराठी जवळपास नाहीच. त्यामुळे मराठी वाचकांसाठी मराठी भाषेत अर्थ देण्याचे ठरले.

मौन एकादशी (२५ डिसेंबर २०२०) ते मौन अमावस्या (११ फेब्रुवारी २०२१) या कालावधित प्राकृत भाषेतील दिवसाला एक सुभाषित फेसबुकवर मराठी अर्थासह लिहायचे असे ठरले. दरम्यान काही दु:खद कारणांनी यात काही दिवसाचा खंड पडला. सुरुवातीस वाटले की प्राकृत भाषेबद्दल फार कमी लोकांना माहिती आहे, तसेच संस्कृत भाषेशी शालेय जीवनात परिचय झाल्यामुळे थोडीफार का असेना वाचता येते आणि कळते, पण प्राकृतचा तसा शालेय संबंध काहीच नाही, मग हे लिहिलेले श्लोक वाचणार तरी कोण? पण या शंकेचे निरासन व्हॉटसॅप् वरील “इंडिओ रूटस्” या ग्रुपवरील सदस्यांनी केले. त्यांचा उत्साह आणि या भाषेबद्दल असलेल्या कुतूहलामुळे श्लोकांच्या भाषांतराव्यतिरिक्त तो श्लोक ज्या ग्रंथातून उद्धृत केला त्या ग्रंथाबद्दलच्या मोजक्या माहितीसह प्रसारित करू लागलो. हे सर्व शक्य झाले ते या सदस्यांमुळेच. त्यानंतर कु. मृण्मयी अ. पटवर्धन यांना या गाथा दाखवल्या त्यावेळी त्यांनी स्व-उत्साहाने इंग्रजी अनुवाद अल्पकाळात आनंदाने करून दिला व कु. आमोद मा. केळकर यांनी मराठी आणि कु. गौरी कोल्हे यांनी इंग्रजी लेखन तपासून दिले याबद्दल मी तिघांचा ऋणी आहे. डॉ. विजया वि. कदम आणि श्री. विष्णु भा. अभ्यंकर यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनामुळे ही पुस्तिका पूर्ण होऊ शकली तसेच वेळोवेळी मदत करणारे सर्व हितचिंतकांचाही मी ऋणी आहे.

ही लहान पुस्तिका एका हस्तलिखिताप्रमाणे जशी जमेल तशी आम्ही तयार केली असून यात वापरण्यात आलेली जैन हस्तलिखितांमध्ये आढळणारी चित्रे ही विकीमिडिया कॉमन्स वरून साभार घेतली आहेत. या पुस्तकात आम्ही फक्त गाथा देत आहोत. उद्धृत गाथेच्या ग्रंथाविषयीची माहिति इतर पुस्तकांमध्ये उपलब्ध असल्याने आम्ही आपल्या सर्वांना ते पुस्तक वाचण्यासाठी प्रेरित करतो, तसेच काही वेगळया गाथांचा समावेश यात केला आहे, जेणेकरून याचे नाविन्य टिकून राहिल. यातील आम्ही लावलेला मराठी आणि सुलभ इंग्रजी अर्थ कदाचित काही प्राकृत भाषाविदांना योग्य वाटणार नाही, त्याबद्दल आमची अल्पमति हीच दोषी आहे. इंग्रजी अर्थात काही शब्द हे जसेच्या तसेच ठेवले आहेत.

परंतु काहीही नसण्यापेक्षा काहीतरी असलेले बरे या ध्येयाने हे आपल्यासमोर आणण्याचे धाडस करीत आहोत. यातील ट्रान्सलिटरेशनचा उच्चारासाठी उपयोग होईल. शेवटी या सगळया उपक्रमामागे एकच उद्देश आहे की या गाथांच्या परिचयाने विविध विद्याशाखेतील अभ्यासु लोक प्राकृत भाषा शिकून प्राकृत भाषा-साहित्य संशोधनाकडे वळतील, हा उद्देश किती सफल झाला याचे उत्तर भविष्यावर सोडून येथे विराम घेतो...

आपला स्नेहाभिलाषी,

देवेश चे. शाह
अंमळनेर – ४२५ ४०१
पौष अमावस्या, विक्रम संवत् २०६६
फेब्रुवारी ११, २०२१.

Few words...

For a long time there has been a custom to write a foreword for a book. But is there any real need to write a foreword for this short compilation? This question lingered in my mind. Anyhow, let me try to explain the motive behind this small compilation of various Prakrit verses.

Around an year ago when the COVID-19 pandemic hit the nation of India and when State government and Central government implemented strict lockdown as a safety measure, it was indeed a turning point for all of us. In the beginning, we all spent time thinking about what we should do at home? Or what can be done at home? News on the television became a negative force for our mental health. Therefore, we all started to spend our time on social media apps like Facebook, WhatsApp, etc. During this time, many scholars from different fields of study started to post limited but accurate information about their respective fields. It was a flood with a series of articles and webinars. People wrote a lot about many different academic and non-academic subjects, creating a great flow of content in large amounts, I believe this much flow of information and knowledge transfer wasn't there early despite the fact that the internet has been here for quite a while. We can rightly term this as 'The Era of the Internet.'

As this exchange of information was happening on Instagram and other platforms, some young scholars and linguaphiles of Sanskrit language started posting one *Śloka* per day with translation. I was curious if people would post some Prakrit *Śloka* or *Gāthā* as they are normally called, but I came across only handful of them on Facebook which were posted in groups related to Prakrit language. The translation of these *Ślokas* was in Hindi or English. I was not content with this. Though this literature is so vast, it is a shocking reality to see that no one was writing about it. It might be the case, I was looking on the wrong platform.

A language as ancient as Sanskrit, the Prakrit language literature is indeed a unique thought process which we have inherited as a cultural heritage. One thing is certain though, the study of Prakrit language is not happening on a large scale as it should, in our country. Contribution of Prakrit languages in the formation of modern day languages is as important as that of Mount Everest. When we say Prakrit language, there are *Māgadhī*, *Ardhamāgadhī*, *Śaurasenī*, *Mahārāṣṭrī*, *Apabhraṁśa*, etc. Literature dating from 6th century B.C.E. is available. Many of the rock inscriptions of Ancient India are in Prakrit language. There is a slight difference between Prakrit in epigraphs and in literature. This language of the People and the literature belongs to every one of us. On Internet Archive one can find some books in translated into Hindi and English language but rarely in Marathi. That is why, this book is in Marathi for Marathi readers.

Starting from *Mauna Ekādaśī* (25 December 2020) to *Mauna Amāvasyā* (11 February 2021) I decided to publish one *Śloka* per day with Marathi translation on Facebook. Due to some tragic reasons there was a gap of some days. I thought that very few people knew about Prakrit language, all have Sanskrit as there 3rd language during their school days, as it is introduced in school, people will read those *śloka* and get to know the meaning on some level, but Prakrit has no relation during the school years then who will read about Prakrit? The participants on "Indigo Roots", a WhatsApp group, cleared this doubt. Due to their enthusiasm I started to mention the original text from which the *śloka* was taken as well as information about the same. This has become possible because of them. When I discussed these *gāthās* with Miss Mrunmayee A. Patwardhan she herself insisted on translating them into English, and did so in a short span of time. Master Aamod M. Kelkar checked the Marathi translation and Miss Gauri Kohle checked the English translation. By providing their valuable guidance, Dr. Vijaya V. Kadam and Mr. Vishnu B. Abhyankar helped us throughout this process. I am in debt to all of them who helped me from time to time.

We have tried creating this booklet like a manuscript, the Jain miniature painting pictures in this booklet are taken from Wikimedia commons. Information about the text from which these *Gāthās* are taken from is available in other books, we encourage all of you to read about it from those books. Different *Gāthās* are included as well, so as to maintain its newness. Some of the Prakrit scholars may find that the meaning written by some *Gāthās* is not as accurate, for that our ignorant intellect is to be blamed. In English some words have been retained as they are.

"It is better to present something rather than nothing" is our motto behind publishing this small compilation, we present this in front of you all. The transliteration herein will help for proper pronunciation. In the end, the aim behind this project is to encourage all of the erudite people of different branches to learn Prakrit and study the literature of the same, I do not know if this aim will be fulfilled or not; leaving it to the future I stop here…

Yours lovingly,

Devesh C. Shah
Amalner- 425 401

Pauṣa Amāvasyā, Vikrama Saṁvat 2066
February 11th, 2021.

सयलाओ इमं वाआ विसन्ति एत्तो अ णेन्ति वायाओ।
एन्ति समुद्दंचिअ णेन्ति सायराओच्चिय जलाइं॥

- गउडवहो ९३

Sayalāo Imaṁ Vāā Visanti Etto A Ṇenti Vāyāo /
Enti Samuddaṁcia Ṇenti Sāyāocciya Jalāiṁ //

- Gauḍavaho 93

अशा या प्राकृत भाषेत सर्व भाषा सामावतात आणि सगळ्या भाषा या भाषेतून निघतात. ज्याप्रमाणे पाणी समुद्रातून निघून शेवटी समुद्रासच मिळते.

As the rain water ultimately meets the sea like that all the languages are born from the Prakrit and retreat to it.

पाइयकव्वस्सनमो पाइयकव्वं च निम्मियं जेण।
ताइं चिय पणमामो पढिऊण य जेवि याणंति॥

- वज्जालग्ग (कव्ववज्जा) ३.१३

Pāiyakavvassanamo Pāiyakavvaṁ Ca Nimmiyaṁ Jeṇa /
Tāiṁ Ciya Panamāmo Paḍhiūṇa Ya Jevi Yāṇaṁti //

- Vajjālagga (Kavvavajjā) 3.13

प्राकृत काव्यास नमस्कार, प्राकृत काव्य निर्माण करणाऱ्यास नमस्कार आणि जे वाचून समजतात त्यांनासुद्धा

Obeisance to Prakrit poetry, obeisance to those who created it and to them also who understand it after reading.

धम्मो मंगलमुक्किट्ठं अहिंसा संजमो तवो।
देवा वि तं नमंसंति जस्स धम्मे सया मणो॥

- दसवेयालिय १.१

Dhammo Maṁgalamukkiṭṭhaṁ Ahiṁsā Saṁjamo Tavo /
Devā Vi Taṁ Namaṁsaṁti Jassa Dhamme Sayā Maṇo //

- Dasaveyāliya 1.1

अहिंसा, संयम आणि तप हा उत्कृष्ट धर्म असे मंगल आहे. ज्यांचे मन सदा या धर्मात रमलेले असते त्यांना देवही नमस्कार करतात.

Non-violence, Truth and Penance is the most auspicious *dharma*. Even heavenly Gods bow down in front of those whose mind is always immersed in it.

कुसग्गे जह ओसबिंदुए थोवं चिट्ठइ लंबमाणए।
एवं मणुयाण जीवियं समयं गोयम मा पमायए॥

- उत्तरज्झयण १०.२

Kusagge Jaha Osabiṁdue Thovaṁ Ciṭṭhai laṁbamāṇae /
Evaṁ Maṇuyāṇa Jīviyaṁ Samayaṁ Goyama! Mā Pamāyae //

- Uttarajjhayaṇa 10.2

कुश गवताच्या अग्रभागी जसे दव बिंदू थोडाच काळ राहतो, तसे हे मनुष्याचे जीवन आहे. त्यामुळे हे गौतमा! क्षणाचाही आळस करू नकोस.

As a dewdrop stays for a short while at the tip of the sacred grass; alike is human life. O *Gautama*! Do not be idle for a second.



जहा खरो चंदणभारवाही भारस्स भागी न हु चंदणस्स।
एवं खु नाणी चरणेण हीणो, नाणस्स भागी न हु सोग्गईए॥

- आवश्यकनिर्युक्ति १००

Jahā Kharo Caṁdaṇabhāravāhī Bhārassa Bhāgī Na Hu Caṁdaṇassa /
Evaṁ Khu Nāṇī Caraṇeṇa Hīṇo Nāṇassa Bhāgī Na Hu Soggaīe //

- Āvashyakaniryukti 100

ज्याप्रमाणे चंदनाचा भार वाहणारा गाढव हा त्या भाराचा (भार वाहण्यासाठीचा) जबाबदार असतो चंदनाच्या गुणांचा नाही, त्याचप्रमाणे चारित्र्य नसलेला ज्ञानी हा फक्त ज्ञानाचा जबाबदार असतो सद्गतीचा नाही.

A donkey that transports sandalwood is liable for the weight of it and not the intrinsic qualities of the sandalwood. In the same way, a scholar without good character is liable for knowledge not for moral progress.

जं जि खमेइ समत्थो धणवंतो जं न गव्वमुव्वहइ।
जं च सविज्जो नमिरो तिसु तेसु अलंकिया पुहवी॥

- वज्जालग्ग (नीइवज्जा) ८.७

Jaṁ Ji Khamei Samattho Dhaṇavaṁto Jaṁ Na Gavvamuvvahai /
Jaṁ Ca Savijjo Namiro Tisu Tesu Alaṁkiyā Puhavī //

- Vajjālagga (Nīivajjā) 8.7

सामर्थ्यवान जो क्षमा करतो, धनवान ज्याला गर्व नाही आणि नम्र असा विद्वान या तिघांनी पृथ्वी अलंकृत आहे.

The earth is bejewelled with these three - a mighty who forgives, a wealthy who does not have any hubris and a scholar who is humble.

ते विरला सप्पुरिसा जे अभणंता घडेंति कज्जालावे।
थोअ चिअ ते वि दुमा जे अमुणिअकुसुमनिग्गमा देंति फलं॥

- सेतुबंध ३.९

Te Viralā Sappurisā Je Abhaṇaṁtā Ghaḍeṁti Kajjālāve /
Thoa Cia Te Vi Dumā Je Amuṇiakusumaniggamā Deṁti Phalaṁ //

- Setubaṁdha 3.9

ते सत्पुरुष विरळच असतात जे काहीही न सांगता कार्य करून टाकतात, असे वृक्षही फारच कमी असतात जे विनापुष्प फळ देतात.

Those virtuous men are rare who act and get the work done even if they are not told to do so. Similarly, the trees which give fruits without blossoms are rare.

पेच्छह विवरीयमिमं बहुया मइरा मएइ ण हु थोवा।
लच्छी उण थोवा जह मएइ ण तहा इर बहूया॥

- गउडवहो ८६०


Pecchaha Vivarīyamimaṁ Bahuyā Mairā Maei Ṇa Hu Thovā /
Lacchī Uṇa Thoā Jaha Maei Ṇa Tahā Ira Bahūyā //

- Gauḍavaho 860

बघा ही किती उलट गोष्ट आहे! खूप दारू प्यायल्यानंतर नशा चढते; थोडी दारू प्यायल्याने नाही, परंतु थोडी लक्ष्मी माणसाला गर्वाने उन्मत्त बनवते; तितकी अधिक लक्ष्मी नाही.

Look! How absurd it is! when one drinks alcohol too much then loses his senses, not by drinking a little. Having little money makes one full of arrogance, not having more (i.e. being rich).

मल्लयुद्ध



जो सहस्सं सहस्साणं संगामे दुज्जए जिणे।
एगं जिणेज्ज अप्पाणं एस से परमो जओ॥

- उत्तरज्झयण ९.३४

Jo Sahassaṁ Sahassāṇaṁ Saṁgāme Dujjae Jiṇe /
Egaṁ Jiṇejja Appāṇaṁ Esa Se Paramo Jao //

- Uttarajjhayaṇa 9.34

जिंकण्यास कठीण अशा युध्दात जो दहा लाख योद्ध्यांना जिंकतो, त्यापेक्षा जो स्वतःला जिंकतो, त्याचाच विजय हा श्रेष्ठ असा विजय आहे.

The win of a person, who has conquered his own self is greater than that of the one who has defeated one million warriors in a tough battle.

किं पढिएणं बुद्धीए किं व किं तस्स गुणसमूहेण।
जो पियरविढत्तधणं भुंजइ अज्जणसमत्थो वि॥

- पाइअकहासंगह १९

Kiṁ Paḍhieṇaṁ Buddhīe Kiṁ Va Kiṁ Tassa Guṇasamūheṇa /
Jo Piyaraviḍhattadhaṇaṁ Bhuṁjai Ajjaṇasamattho Vi //

- Pāiakahāsaṁgaha 19

शिक्षणाचा काय उपयोग? बुद्धीचे प्रयोजन काय अथवा त्याच्या गुणांचा अर्थ तरी काय? जर कोणी पैसे कमविण्यास सक्षम असूनही पित्याने कमविलेल्या धनाचा उपभोग घेत आहे.

How education is of any use? What is the use of intellect? Or what is the use of his virtue? If a person is taking advantage of his father’s income, even though he is capable of earning his own money.

कोहो पीइं पणासेइ माणो विणयनासणो ।
माया मित्ताणि नासेइ लोहो सव्वविणासणो ॥

- दसवेयालिय ८.३७

Koho Pīiṁ Paṇāsei Māṇo Viṇayanāsaṇo /
Māyā Mittaṇi Nāsei Loho Savvaviṇāsaṇo //

- Dasaveyāliya 8.37

क्रोध हा प्रीतिचा विनाश करतो, मान विनयाचा नाश करतो, माया मित्रत्वाचा नाश करते तर लोभ सर्वविनाशक आहे. (प्रीति, विनय आणि मित्रत्व या तिन्ही गोष्टींचा विनाश लोभ करतो.)

Anger kills love, pride kills modesty, guile kills a friendship but greed kills all. (Love, modesty and friendship are all destroyed by greed.)

जं कल्ले कायव्वं अज्जं चिय तं करेह तुरमाणा।
बहुविग्घो य मुहुत्तो मा अवरण्हं पडिक्खेह॥

- जंबूचरिय ६.२०४

Jaṁ Kalle Kāyavvaṁ Ajjaṁ Ciya Taṁ Kareha Turamāṇā /
Bahuviggho Ya Muhutto Mā Avaraṇhaṁ Paḍikkheha //

- Jaṁbūcariya 6.204

जे उद्या करायचे आहे त्याला आजच लवकर करून टाकावे. (कारण) प्रत्येक मुहूर्त हा बहुविघ्नमय आहे त्यामुळे दुपारची अपेक्षा करू नये.

Do it right now, what you have planned to do tomorrow. Because every moment is filled with obstacles, therefore don't wait till the afternoon in search of the right time.

दारिद्दय तुज्झ नमो जस्स पसाएण एरिसी रिद्धी।
पेच्छामि सयल लोए ते मह लोया न पेच्छंति॥

- वज्जालग्ग (दारिद्दवज्जा) १४.२

Dāriddaya Tujjha Namo Jassa Pasāeṇa Erisī Riddhī /
Pecchāmi Sayala Loe Te Maha Loyā Na Pecchaṁti //

- Vajjālagga (Dāriddavajjā) 14.2

हे दारिद्र्या! तुला नमस्कार असो, ज्याच्या कृपाप्रसादाने ही अशी रिद्धी मला प्राप्त झाली. माझे डोळे जगताला पाहू शकतात पण जगत मला पाहू शकत नाही.

O poverty! I bow to thee, because of whom I received this opulence/supernatural power. My eyes can see the whole world while the world cannot see me.



जागरह नरा णिच्चं जागरमाणस्स वड्ढते बुद्धी।
जो सुवति ण सो धण्णो, जो जग्गति सो सया धण्णो॥

- बृहत्कल्पलघुभाष्य ३३८२

Jāgaraha Narā Ṇiccaṁ Jāgaramāṇassa Vaḍḍhate Buddhī /
Jo Suvati Ṇa So Dhaṇṇo Jo Jaggati So Sayā Dhaṇṇo //

- Bṛhatkalpalaghubhāṣya 3382

हे मनुष्यांनो जागृत रहा! नित्य जागृत राहणाऱ्याची बुद्धी वाढते. जो झोपतो तो धन्य होत नाही, जो जागृत आहे तो सदा धन्य आहे.

O People always be alert! An alert person's wisdom grows. The one who is not alert is never blessed; the one who is alert is always blessed.

* येथे धन्य होणे म्हणजे ज्ञानादिने धन्य होणे.

* Here, blessed means blessed by knowledge.

अप्पा कत्ता विकत्ता य दुहाण य सुहाण य।
अप्पा मित्तममित्तं च दुप्पट्ठिय-सुपट्ठिओ॥

- उत्तरज्झयण २०.३७

Appā Kattā Vikattā Ya Duhāṇa Ya Suhāṇa Ya /
Appā Mittamamittaṁ Ca Duppaṭṭhiya-Supaṭṭhio //

- Uttarajjhayaṇa 20.37

आपणच आपल्या सुखाचे आणि दुःखाचे कर्ते व भोक्ते आहोत. चांगल्या कार्यात रमलेला आत्माच आपला मित्र तर वाईट कार्यात रमलेला आत्मा आपला शत्रु आहे.

We alone are the means and the ends of our suffering. A soul which is busy in good deeds is our friend and that which is busy doing evil things is our enemy.

सोहेइ सुहावेइ अ उवहुज्जंतो लवो वि लच्छीए।
देवी सरस्सई उण असमग्गा किं पि विणडेइ॥

- गउडवहो ६८

Sohei Suhāvei A Uvahujjaṁto Lavo Vi Lacchīe /
Devī Sarassaī Uṇa Asamaggā Kiṁ Pi Viṇaḍei //

- Gauḍavaho 68

तीळमात्र लक्ष्मीचा उपभोग घेणारासुद्धा सुख आणि शोभा प्राप्त करतो, पण जर का देवी सरस्वती अपूर्ण राहिली तर कुणाचीही विडंबना होइलच.

A Consumer of just a little bit of money can experience joy and splendour. But if knowledge is incomplete then anyone can be subject to mockery.

हियडा संकुडि मिरिय जिम्व इंदियपसरु निवारी।
जित्तिउ पुज्जइ पंगुरणु तित्तिउ पाउ पसारि॥

- कुमारवालपडिबोह प्रस्ताव १ : परधनहरणे वरुणकथा

Hiyaḍā Saṁkuḍi Miriya Jimva Iṁdiyapasaru Nivārī /
Jittiu Pujjai Paṁguraṇu Tittiu Pāu Pasāri //

- Kumāravālapaḍiboha Prastāva 1 : Paradhanaharaṇe Varuṇakathā

हृदयाला काळ्या मिरीप्रमाणे संकुचित करा ज्यामुळे इंद्रियांचा विस्तार थांबवला जाईल. जेवढे मोठे अंथरूण आहे तेवढेच पाय पसरविले पाहिजे.

Contract your heart like that of a black peppercorn, so that the desires would not increase. One should not bite off more than they can chew.



सेयंबरो य आसंबरो य बुद्धो य अहव अन्नो वा।
समभावभावियप्पा लहेय मुक्खं न संदेहो॥

- संबोध सत्तरि २

Seyaṁbaro Ya Āsaṁbaro Ya Buddho Ya Ahava Anno Vā /
Samabhāvabhāviyappā Laheya Mukkhaṁ Na Saṁdeho //

- Saṁbodha Sattari 2

श्वेतांबर असो वा दिगंबर, बौद्ध असो वा कोणी अन्य; आत्म्यात समता भाव असल्यावरच मोक्षप्राप्ती होते, यात शंका नाही.

Either *Śvetāmbara* or *Digaṁbara*, be a Buddhist or any other; only if the soul is benevolent then one can attain *moksha*, this is beyond doubt.

एहु धम्मु परमत्थु कहिज्जइ तं परपीडि होइ तं न किज्जइ।
जो परपीड करइ निच्चिंतउ सो भवि भमइ दुक्खसंतत्तउ॥

- सुपासनाहचरिय : विजयचंदकहा ६३

Ehu Dhammu Paramatthu Kahijjai Taṁ Parapīḍi Hoi Taṁ Na Kijjai /
Jo Parapīḍa Karai Nicciṁtau So Bhavi Bhamai Dukkhasaṁtattau //

- Supāsanāhacariya : Vijayacaṁdakahā 63

ज्याने दुसऱ्याला पीडा होईल ते करू नये हा धर्माचा परम सार सांगितला आहे. जो निश्चिंत होऊन दुसऱ्याला त्रास देतो तो दुःखांनी संतप्त होऊन वेगवेगळ्या जन्मात जन्म घेत फिरत राहतो.

‘Never do something which will hurt others’ is the ultimate essence of the *dharma*. The one who constantly torments others without any guilt, gets reborn in different cycles and lives a life full of sorrow, again and again.

रण्णाउ तणं रण्णाउ पाणिअं सव्वअं सअंगाहं।
तइ वि मआणं मईणं अ आमरणन्ताइं पेम्माइं॥

- गाहासत्तसई ३.८७

Raṇṇāu Taṇaṁ Raṇṇāu Pāṇiaṁ Savvaṁ Saaṁgāhaṁ /
Tai Vi Maāṇaṁ Maīṇaṁ A Āmaraṇantāiṁ Pemmāiṁ //

- Gāhāsattasaī 3.87

वनातच गवत आणि वनातच पाणी मिळते, सगळीकडे स्वतःला ते घ्यावे लागते. तरीसुद्धा हरिणाचे आणि हरिणीचे प्रेम आमरण टिकते.

In the forest one gets grass and water, everywhere you have to take it by yourself. Yet the love between a buck and a doe lasts till they die.

जस्स न हिअयंमि बलं कुणंति किं हंत तस्स सत्थाइं।
निअसत्थेणऽवि निहणं पावंति पहीणमाहप्पा॥

- भवभावना, स्वोपज्ञा ६५१

Jassa Na Hiayaṁmi Balaṁ Kuṇaṁti Kiṁ Haṁta Tassa Satthāiṁ /
Niasattheṇa'vi Nihaṇaṁ Pāvaṁti Pahīṇamāhappā //

- Bhavabhāvanā, Svopajñā 651

ज्याच्या हृदयात बल नाही. अरे! त्याच्या शस्त्रांचा काय उपयोग? स्वतःचे शस्त्र असूनसुद्धा दुर्बल लोक निधन पावतात.

What is the use of weapons? For he who does not have strength in his heart! Weaklings die even though they have their own weapon.

चउक्कसाय-पडिमल्लुल्लूरणु दुज्जय-मयण-बाण-मुसुमूरणु।
सरस-पियंगु-वण्णु गय गामिउ जयउ पासु भुवणत्तय-सामिउ॥


- पासणाहजिणथुई (चउक्कसायसुत्त) १

Caukkasāya-paḍimallullūraṇu Dujjaya-mayaṇa-bāṇa-musumūraṇu /
Sarasa-piyaṁgu-vaṇṇu Gaya Gāmiu Jayau Pāsu bhuvaṇattaya-sāmiu //

- Pāsaṇāhajiṇathuī (Caukkasāyasutta) 1

चार कषाय (क्रोध, मान, माया आणि लोभ) रूपी समोर असलेल्या प्रतिस्पर्धी मल्लांचा नाश करणाऱ्या, जिंकण्यास कठीण अशा मदनांच्या बाणांना तोडणाऱ्या, नवीन प्रियंगुलते समान ज्यांची कांती आहे, हत्तीच्या समान ज्याची गती आहे अशा त्रिभुवनाचे स्वामी पार्श्वनाथांचा जय असो.

The one who has annihilated wrestlers like the four *kaṣāyas* (anger, pride, guile and greed), The one who has broken the arrows of Cupid which are hard to overcome, The one who has glow like a new *Priyaṁgu* creeper, The one whose speed is magnificent as an elephant, Praise to thee Pārśvanātha – The lord of three worlds.



भ. पार्श्वनाथ प्रतिमा

बालत्तणम्मि हरिणो जअइ जसोआएँ चुंबिअं वअणं।
पडिसिद्धणाहिमग्गुद्धणिग्गअं पुंडरीअं व॥

- गउडवहो २२

Bālattaṇammi Hariṇo Jaai Jasoāê Cuṁbiaṁ Vaaṇaṁ /
Paḍisiddhaṇāhimagguddhaṇiggaaṁ Puṁḍarīaṁ Va //

- Gauḍavaho 22

बालपणी यशोदाद्वारा चुंबित त्या कृष्णाच्या मुखाचा जय असो! जे नाभीचा मार्ग अडविला गेल्याने (वरून निघालेल्या) कमळा समान आहे.

Praise to the face of *Viṣṇu*! which was kissed by *Yaśodā* in his childhood. Whose face is like that of a lotus, (which springs from upside) whose way is blocked from the navel.

लोआणं लोअणेहिं सह कमलवणं अद्धणिद्दं कुणंतो। मुंचंतो तिव्वभावं सह अ सरहसं माणिणीमाणसेहिं॥ मंजिट्ठरत्तसुत्तच्छाविकिरणचओ चक्कवाएक्कमित्तो। जाओ अत्थाचलत्थो उवह दिणमणी पिक्कणारिंगपिंगो॥ - कप्पूरमंजरी : जवनिका २, श्लोक ५०

Loāṇaṁ Loaṇehiṁ Saha Kamalavaṇaṁ Addhaṇiddaṁ Kuṇaṁto / Muṁcaṁto Tivvabhāvaṁ Saha A Sarahasaṁ Māṇiṇīmāṇasehiṁ // Maṁjiṭṭharattasuttacchāvikiraṇacao Cakkavāekkamitto / Jāo Atthācalattho Uvaha Diṇamaṇī Pikkaṇāriṁgapiṁgo // - Kappūramaṁjarī : Javanikā 2, Śloka 50

लोकांची लोचने कमळांच्या ताटव्यांसोबत अर्धवट निद्रिस्त करून, मानिनींच्या मनाच्या उतावळेपणासह तीव्रभावांना सोडून, मंजिष्टेने रंगीत दोऱ्याप्रमाणे तेज असणाऱ्या किरणांनी युक्त व चक्रवाकांचा एकमेव मित्र, पिकलेल्या संत्र्याप्रमाणे तांबूस दिसणारा असा सूर्य अस्ताला जात आहे.

Along with the lotuses the one who has enchanted the eyes of the people with sleep, the one who has lessened the heat with the pride of envious women, whose rays have a radiance similar to the strings dyed by Indian madder and he who is the only friend of Ruddy Shelducks; the sun who has an orange tinge like a ripened orange set sails for the night.

तं नत्थि घरं तं नत्थि देउलं राउलं पि तं नत्थि।
जत्थ अकारणकुविया दो तिन्नि खला न दीसंति॥

- वज्जालग्ग (दुज्जणवज्जा) ६१*१

Taṁ Natthi Gharaṁ Taṁ Natthi Deulaṁ Rāulaṁ Pi Taṁ Natthi /
Jattha Akāraṇakuviyā Do Tinni Khalā Na Dīsaṁti //

*- Vajjālagga (Dujjaṇavajjā) 61*1*

ते घर नाही, ते देऊळ नाही तसेच तो राजवाडाही नाही, जेथे विनाकारण क्रोध करणारे दोन-तीन दुष्ट नाही दिसत.

There is no house, no temple nor a palace where we cannot see two-three wicked people who get angry without any reason.

रन्ने जलम्मि जलणे दुज्जणजणसंकडे व्व विसमम्मि।
जीहं व्व दंतमज्झे नंदइ अपमत्तयाजुत्तो॥


- जिनदत्ताख्यान २०२

Ranne Jalammi Jalaṇe Dujjaṇajaṇasaṁkade Vva Visamammi /
Jīha Vva Daṁttamajjhe Naṁdai Apamattayājutto //

- Jinadattākhyāna 202

सावध व्यक्ती अरण्यात, पाण्यात, अग्नीने आणि दुर्जनांनी वेढलेला असूनसुद्धा दातांमध्ये असलेल्या जीभेप्रमाणे आनंद अनुभवतो.

A vigilant person even if he is surrounded by forest, water, fire or by a group of vicious people enjoys the happiness like a tongue situated between teeth.



थेवं थेवं धम्मं करेह जइ ता बहुँ न सक्केह।
पेच्छह महानईओ बिंदूहि समुद्दभूयाओ॥

- अक्खाणमणिकोस १९.१४

Thevaṁ Thevaṁ Dhammaṁ Kareha Jai Tā Bahuṁ Na Sakkeha /
Pecchaha Mahānaīo Biṁdūhi Samuddabhūyāo //

- Akkhāṇamaṇikosa 19.14

जर खूप करू शकत नसाल तर थोडा थोडा धर्म करा. पहा या महानद्यांना, थेंबांनी समुद्र होतात.

If you cannot observe the *dharma* fully, do it little by little. See, how each drop makes huge rivers and turn them into the sea.

जं दिज्जइ तं पावियइ एउ ण वयणु विसुद्धु।
गाइ पइण्णइ खडभुसइं किं ण पयच्छइ दुद्धु॥

- सावयधम्मदोहा ९२

Jaṁ Dijjai Taṁ Pāviyai Eu Ṇa Vayaṇu Visuddhu /
Gāi Paiṇṇai Khaḍabhusaiṁ Kiṁ Ṇa Payacchai Duddhu //

- Sāvayadhammadohā 92

‘जे देतो तेच मिळते’ असे बोलणे योग्य नाही. गाईला घास-चारा खाऊ घातल्यावर ती दूध देत नाही का?

Saying ‘you get what you give’ is not correct. Cow is fed with hay and grass yet it gives the milk, doesn’t it?

आसा रक्खइ जीयं सुट्ठु वि दुहियाण एत्थ संसारे।
होइ निरासाण जओ तक्खणमित्तेण मरणं पि॥

- नाणपंचमीकहा : भविस्सयत्तकहा १२१

Āsā Rakkhai Jīyaṁ Suṭṭhu Vi Duhiyāṇa Ettha Saṁsāre /
Hoi Nirāsāṇa Jao Takkhaṇamitteṇa Maraṇaṁ Pi //

- Nāṇapaṁcamiīkahā : Bhavissayattakahā 121

या संसारात दुखावलेल्यांच्या जीवनाची आशा चांगली रक्षा करते. जो निराश झाला तो क्षणमात्रातच मृत्यु पावतो.

In this mortal world, Hope well protects a person who is suffering. One who gets depressed perishes in a short span of time.

खम्मइ कुबोहसेलो खणिज्जए मूलओवि पावतरु।
हम्मइ कली हणिज्जइ कम्मं सुअदेविझाणेण॥

- कुमारवालचरिय भाग २ : ७.७८

Khammai Kubohaselo Khaṇijjae Mūlaovi Pāvataru /
Hammai Kalī Haṇijjai Kammaṁ Suadevijhāṇeṇa //

- Kumāravālacariya Part 2 : 7.78

श्रुतदेवीचे (सरस्वती देवीचे) ध्यान केल्याने कुबुद्धीरूपी पर्वत विदीर्ण होतो, पापरूपी वृक्ष मूळासकट खणला जातो, कलिकाल नष्ट होऊन जातो आणि ज्ञानावरणीय कर्मांचा नाश होतो.

By the meditation of Goddess *Sarasvatī* the mountain of ignorance erodes, the tree of demerits is uprooted, dark times come to the end and karmas which obstruct the knowledge are destroyed.

आहिअ समराअमणा वसणम्मि अ उच्छवे अ समराअमणा ।
अवसाअअविसमत्था धीरच्चिअ होंति संसए वि समत्था ॥

- सेतुबंध ३.२०

Āhia Samarāamaṇā Vasaṇammi A Ucchave A Samarāamaṇā /
Avasāaavisamatthā Dhīraccia Hoṁti Saṁsae Vi Samatthā //

- Setubaṁdha 3.20

रणभूमीत योग्य प्रकारे ज्यांनी आपल्या मनाला समर्पित केले आहे, विपत्ती आणि उत्सवांमध्ये ज्यांचे मन एकसारखेच राहते अश्या सामर्थ्यवान व्यक्ती समोर आलेल्या संकटांमध्ये हतबल होऊन (फळांचा किंवा प्राणांचा) संशय असल्यावरही धैर्यवान राहतात.

Those who have devoted their minds in a battlefield in a right way, whose minds remain the same during crisis and the good times, are the true virtuous people who remain strong even in the face of crisis whose outcome is ambiguous.

विणएण विप्पहूणस्स हवदि सिक्खा णिरत्थिया सव्वा।
विणओ सिक्खाए फलं विणयफलं सव्वकल्लाणं॥

- भगवतीआराधना १३०

Viṇaeṇa Vipphūṇassa Havadi Sikkhā Ṇiratthiyā Savvā /
Viṇao Sikkhāe Phalaṁ Viṇayaphalaṁ Savvakallāṇaṁ //

- Bhagavatīārādhanā 130

विनयरहिताची सगळी शिक्षा निरर्थक होते. शिक्षेचे फळ विनय आहे, विनयाचे फळ सर्वकल्याण.

Knowledge of an immoral person becomes futile. Morality is the fruit of knowledge and universal well-being is the fruit of morality.

उदगेण जे सिद्धिमुदाहरंति। सायं च पायं उदगं फुसंता॥
उदगस्स फासेण सिया य सिद्धी। सिज्झिंसु पाणा बहवे दगंसि॥

- सूयगडंग ७.१४

Udageṇa Je Siddhimudāharaṁti / Sāyaṁ Ca Pāyaṁ Udagaṁ Phusaṁtā //
Udagassa Phāseṇa Siyā Ya Siddhī / Sijjhiṁsu Pāṇā Bahave Dagaṁsi //

- Sūyagaḍaṁga 7.14

पाण्याने मोक्ष मिळतो असे जे सांगतात ते सायंकाळी आणि प्रातःकाळी पाण्याने स्नान करत राहतात. जर पाण्याच्या स्पर्शाने मोक्ष मिळत असता तर पाण्यातील असंख्य जलचर प्राण्यांना आधीच मोक्ष प्राप्ती झाली असती.

Those who say water brings salvation, they bath in water in the dawn and in the dusk. If bathing in water brings salvation then all the animals in water would have attended *moksha* long ago!

न मुणेइ देसभासा देसायारं न नीइ विन्नाणं।
तत्तो धुत्तेहिं पए पए य वंचिज्जएअ अबुहो॥

- भवभावना, स्वोपज्ञा ८२८

Na Muṇei Desabhāsā Desāyāraṁ Na Nīi Vinnāṇaṁ /
Tatto Dhuttehiṁ Pae Pae Ya Vaṁcijjaea Abuho //

- Bhavabhāvanā, Svopajñā 828

जो देशभाषा जाणत नाही; तसेच नीतिज्ञांचा देशाचार जाणत नाही तो अज्ञानी पावला-पावलांवर धूर्तांकडून ठगला जातो.

He who does not understand local language and does not know the customs of that country; that ignorant person gets cheated by cheats on every step.



नमिऊण जं विढप्पइ खलचलणं तिहुयणं पि किं तेण।
माणेण जं विढप्पइ तणं पि तं निव्वुइं कुणइ॥

- वज्जालग्ग (धीरवज्जा) ९.१०

Namiūṇa Jaṁ Viḍhappai Khalacalaṇaṁ Tihuyaṇaṁ Pi Kiṁ Teṇa /
Māṇeṇa Jaṁ Viḍhappai Taṇaṁ Pi Taṁ Nivvuiṁ Kuṇai //

- Vajjālagga (Dhīravajjā) 9.10

दुराचारी व्यक्तींच्या पाया पडून त्रिभुवन जरी प्राप्त केले तरी काय? स्वाभिमानाने (सन्मानाने) प्राप्त केलेले गवताचे एक पातेसुद्धा कोणालाही सुख देते.

Even if one gets to rule all of the three worlds by bowing down to a tyrant, what is the use? a small leaf of grass obtained by dignity can give contentment to anyone.

जं विसरिसधम्माणं न होइ परिणामसुंदरो नेहो।
नेहं विणा विवाहो आजम्मं कुणइ परिदाहं॥

- नम्मयासुंदरीकहा ३९

Jaṁ Visarisadhammāṇaṁ Na Hoi Pariṇāmasuṁdaro Neho /
Nehaṁ Viṇā Vivāho Ājammaṁ Kuṇai Paridāhaṁ //

- Nammayāsuṁdarīkahā 39

अत्यंत भिन्न स्वभाव असणाऱ्या दोन व्यक्तींचा स्नेह उत्कृष्ट परिणामांचा होत नाही कारण स्नेह नसलेला विवाह आजन्म दाह करतो.

Having totally opposite personalities cannot culminate into the highest form of love. Because marriage without love burns a person from inside for the rest of their life.

सव्वे जीवा वि इच्छंति जीविउं न मरिज्जिउं।
तम्हा पाणवहं घोरं निग्गंथा वज्जयंति णं॥

- दसवेयालिय ६.२०

Savve Jīvā Vi Icchaṁti Jīviuṁ Na Marijjiuṁ /
Tamhā Pāṇavahaṁ Ghoraṁ Niggaṁthā Vajjaṁti Ṇaṁ //

- Dasaveyāliya 6.10

सर्व जीव जगण्याची इच्छा करतात, मरणाची नाही. त्यामुळे प्राणवधाला भयंकर जाणून निर्ग्रंथ त्याचा त्याग करतात.

All the mortals have a wish to live, not a wish to die. That is why the *Nirgranthas* do not indulge themselves in violence.

*Nirgrantha means a Jain monk

अभिहाणमभणंतो वि होइ पयडो गुणेहिं सप्पुरिसो।
छन्नो वि चंदण-दुमो किं न कहिज्जइ परिमलेणं॥

- कुमारवालपडिबोह प्रस्ताव १ : मूलदेवकथानकम्

Abhihāṇamabhaṇaṁto Vi Hoi Payaḍo Guṇehiṁ Sappuriso /
Channo Vi Caṁdaṇa-dumo Kiṁ Na Kahijjai Parimaleṇaṁ //

- Kumāravālapaḍiboha Prastāva 1 : Mūladevakathānakaṁ

संभाषणानेसुद्धा सत्पुरुषाचे गुण प्रकट होतात. चंदनाचे वृक्ष लपवले तरी सुगंधाने ओळखले जाणार नाही काय?

Also by a conversation one can know the virtues of a righteous man. Even if a Sandalwood tree is hidden would not one be able to be recognised by its smell?


जं कल्ले कायव्वं णरेण अज्जे व तं वरं काउं। मच्चू अकलुणहिअओ न हु दीसइ आवयतो वि॥ तूरह धम्मं काउं मा हु पमायं खणंपि कुव्वित्था। बहुविग्घो हु मुहुत्तो मा अवरण्हं पडिच्छाहि॥ - बृहत्कल्पलघुभाष्य ४६७४ - ४६७५

Jaṁ Kalle Kāyavvaṁ Ṇareṇa Ajje Va Taṁ Varaṁ Kāuṁ /
Maccū Akaluṇahiao Na Hu Dīsai Āvayato Vi //
Tūraha Dammaṁ Kāuṁ Mā Hu Pamāyaṁ Khaṇaṁpi Kuvvitthā /
Bahuviggho Hu Muhutto Mā Avaraṇhaṁ Paḍicchāhi //

- Bṛhatkalpalaghubhāṣya 4674-4675

जे उद्या करावयाचे आहे ते माणसाने आजच करून टाकावे; मृत्यु हा करुणारहित हृदयाचा आहे, तो येतांना दिसत नाही. धर्माच्या आचरणासाठी शीघ्रता ठेवा, क्षणासाठीही आळस करू नये; मुहूर्ता-मुहूर्ताला अनेक विघ्न समोर येतात, दुपारची वाटसुद्धा बघू नका.

A person should do the next day’s work today itself; death is compassionless; we cannot see it coming. Be quick to act like your *dharma*; do not linger even for a second. Many obstacles come time and time again, do not wait even for the afternoon.



तसपाणे वियाणेत्ता संगहेण य थावरे।
जो न हिंसइ तिविहेण तं वयं बूममाहणं॥

- उत्तरज्झयण २५.२३

Tasapāṇe Viyāṇettā Saṁgaheṇa Ya Thāvare /
Jo Na Hiṁsai Tiviheṇa Taṁ Vayaṁ Būmamāhaṇaṁ //

- Uttarajjhayaṇa 25.23

जो त्रस (हालचाल करणाऱ्या) आणि स्थावर (एकाठिकाणी स्थिर असणाऱ्या) जीवांना सम्यक् प्रकारे जाणून त्यांची मनाने, वचनांनी आणि शरीराने हिंसा करत नाही त्याला आम्ही ब्राह्मण असे म्हणतो.

After understanding the nature of the motile or the stationary beings, the one who does not abuse them either by his speech, or by his deeds and by his psyche; is the person whom we call *Brahmin*.

जीहाइ कुणंति पिअं भवंति हिअअम्मि णिव्वुइं काउं।
पीडिज्जंता वि रसं जणंति उच्छू कुलीणा अ॥

- गाहासत्तसई ७.४१

Jīhāi Kuṇaṁti Piaṁ Bhavaṁti Hiaammi Ṇivvuiṁ Kāuṁ /
Pīḍijjaṁtā Vi Rasaṁ Jaṇaṁti Ucchū Kulīṇā A //

- Gāhāsattasaī 7.41

ऊस आणि सज्जन हे जीभेने प्रिय करतात, हृदयाला तृप्त करतात आणि पीडा दिल्यावरही रस उत्पन्न करतात.

Sugarcane makes your tongue sweet, satisfies your heart and makes you feel nice even though it gets hurt while eating. The same is with gentlemen.

धम्मो अत्थो कामो पुरिसत्था तिन्नि जीवलोगम्मि।
अत्थो तत्थ पहाणो न धम्मकामा विणा तेण॥

- जिनदत्ताख्यान १४२

Dhammo Attho Kāmo Purisatthā Tinni Jīvalogammi /
Attho Tattha Pahāṇo Na Dhammakāmā Viṇā Teṇa //

- Jinadattākhyāna 142

धर्म, अर्थ आणि काम हे या जगातील तीन पुरुषार्थ आहेत. त्यात अर्थ हा प्रधान, त्याशिवाय धर्म आणि काम नाही.

Dharma, *Artha* and *Kāma* are the three objects of human pursuit in this world. In that, *Artha* is principal without that there is no *Dharma* and *Kāma*.

दिंति फलाइं जहिच्छं कप्पदुमा नेय किंपि जंपंति।
धूमालियजलहरा पाणियं पि दाऊण गज्जंति॥

- गाहारयणकोस १३३

Diṁti Phalāiṁ Jahicchaṁ Kappadumā Neya Kiṁpi Jaṁpaṁti /
Dhūmāliyajalaharā Phāṇiyaṁ Pi Dāūṇa Gajjaṁti //

- Gāhārayaṇakosa 133

कल्पवृक्ष इच्छित फळे देतात तरीही काहीच बोलत नाहीत, करडे मेघ पाणी देऊनसुद्धा गर्जना करतात.

Kalpavṛkṣas give whatever we wish and still they don't talk, Grey Clouds only give water and yet they grumble.

* *Kalpavṛkṣa* is a mythological tree which gives whatever we wish to have.



सव्वो पुव्वकयाणं कम्माणं पावए फलविवायं।
अवराहेसु गुणेसु अ निमित्तमित्तं परो होइ॥

- संबोध सत्तरि ११८

Savvo Puvvakayāṇaṁ Kammāṇaṁ Pāvae Phalavivāyaṁ /
Avarāhesu Guṇesu A Nimittamittaṁ Paro Hoi //

- Saṁbodha Sattari 118

सगळे पूर्वकृत कर्मांनुसार फळ प्राप्त करतात, अपराधात आणि गुणात दुसरे फक्त निमित्तमात्र होतात.

Everyone bears fruits according to their past-life karmas, others are mere efficient cause in the crime and the virtue.

मणुयहं विणयविवज्जियहं गुण सयल वि णासंति।
अह सरवरि विणु पाणियइं कमलइं केम रहंति॥

- सावयधम्मदोहा १३८

Maṇuyahaṁ Viṇayavivajjiyahaṁ Guṇa Sayala Vi Ṇāsaṁti /
Aha Saravari Viṇu Pāṇiyaiṁ Kamalaiṁ Kema Rahaṁti //

- Sāvayadhammadohā 138

विनय नसलेल्या माणसाचे सगळे गुण नष्ट होतात अथवा पाण्याविना सरोवरात कमळं कशी राहू शकतात?

All of the virtues of a person go away if he is not modest. Without water in the lake can lotuses survive?

विणयविवेयपसण्णमणु सीलसुनिम्मलदेहु।
परमप्पह मेलावडउ पुन्निहिं लब्भइ एहु॥


- सिरिसिरिवालकहा ७६

Viṇayaviveyapasaṇṇamaṇu Sīlasunimmaladehu /
Paramappaha Melāvaḍau Punnihiṁ Labbhai Ehu //

- Sirisirivālakahā 76

विनय, विवेक, प्रसन्न मन, शील, सुनिर्मळ देह आणि परमपद मिळवणे, पुण्यानेच हे सर्व मिळते.

Modesty, Wisdom, Happy Mind, Virtue, Healthy Body and *Moksha* are only possible to get by merit.



विहवेण जो न भुल्लइ जो न वियारं करेइ तारुन्ने।
सो देवाण वि पुज्जो किमंग पुण मणुयलोयस्स॥

- नाणपंचमीकहा : नंदकहा ९५

Vihaveṇa Jo Na Bhullai Jo Na Viyāraṁ Karei Tārunne /
So Devāṇa Vi Pujjo Kimaṁga Puṇa Maṇuyaloyassa //

- Nāṇapaṁcamīkahā : Naṁdakahā 95

वैभवाने जो भुलत नाही, तारुण्यात ज्याला विकार होत नाही. तो देवतांचासुद्धा पूज्य आहे तर मग मनुष्यलोकाचे काय सांगू?

One who is not lured by money, does not get corrupt in his youth; that person is revered also by the Gods then what should I say about the mortal world?

अद्दंसणेण अइदंसणेण तह अन्नजुवइनेहेण।
माणेण पवासेण य पंचविहं झिज्झए पिम्मं॥

- गाहारयणकोस ४३०

Addaṁsaṇeṇa Aidaṁsaṇeṇa Taha Annajuvaineheṇa /
Māṇeṇa Pavāseṇa Ya Paṁcavihaṁ Jhijjhae Pimmaṁ //

- Gāhārayaṇakosa 430

अदर्शनाने, अतिदर्शनाने तसेच अन्य युवतीच्या प्रेमाने, मानाने आणि प्रवासाने या पाच कारणांनी प्रेम नाहीसे होते.

Love fades away because of these five reasons, not meeting for a long time, meeting frequently or receiving love from another young woman, arrogance and travelling.

जे जे गुणिणो जे जे वि माणिणो जे वियड्ढसंमाणा।
दालिद्द रे वियक्खण ताण तुमं साणुराओ सि॥

- वज्जालग्ग (दारिद्दवज्जा) १४.३

Je Je Guṇiṇo Je Je Māṇiṇo Je Viyaḍḍhasaṁmāṇā /
Dālidda Re Viyakkhaṇa Tāṇa Tumaṁ Sāṇurāo Si //

- Vajjālagga (Dāriddavajjā) 14.3

जे जे गुणीजन आहेत, जे जे स्वाभिमानी आहेत तसेच जे विद्वानांद्वारा सन्मानित लोक आहेत; हे दारिद्र्या विचक्षणा! त्यांच्यावर तुझा अनुराग आहे.

Those who are virtuous, those who have self-respect, those who are rewarded by the wise men; O poverty! O the wise one! They experience your affection.

वेइसरीरल्लीणो मणजलणो नाणघयसुपज्जलिओ। कम्मतरुसमुप्पन्नं मलसमिहासंचयं डहइ॥ कोहो माणो माया लोभो रागो य दोसमोहो य। पसवा हवन्ति एए हन्तवा इन्दिएहि समं॥ सच्चं खमा अहिंसा दायव्वा दक्खिणा सुपज्जता। दंसणचरित्तसंजमबम्भाईया इमे देवा॥ एसो जिणेहिं भणिओ जन्नो तच्चत्थवेयनिद्दिट्ठो। जोगविसेसेण कओ देइ फलं परमनिव्वाणं॥ - पउमचरियं ११ : ७६-७९


प्रा.३०।

Veisarīrallīṇo Maṇajalaṇo Nāṇaghayasupajjalio / Kammatarusamuppannaṁ Malasamihāsaṁcayaṁ Ḍahai // Koho Māṇo Māyā Lobho Rāgo Ya Dosamoho Ya / Pasavā Havanti Ee Hantavā Indiehi Samaṁ // Saccaṁ Khamā Ahiṁsā Dāyavvā Dakkhiṇā Supajjatā / Daṁsaṇacarittasaṁjamabambhāīyā Ime Devā // Eso Jiṇehiṁ Bhaṇio Janno Taccatthaveyaniddiṭṭho / Jogavisesеṇa Kao Dei Phalaṁ Paramnivvāṇaṁ // - *Paumacariyaṁ 11 : 76-79*

शरीर रूपातील वेदिकेत ज्ञानरूपी तुपाने मनरूपी प्रज्वलित अग्नी हा कर्मरूपी वृक्षाचे लाकूड जाळतो. क्रोध, मान, माया, लोभ, राग, द्वेष आणि मोह या पशुंची हवि इंद्रियांसह द्यावी. सत्य, क्षमा, अहिंसा, योग्य त्या दक्षिणेचे दान, सम्यक् दर्शन, चारित्र्य, संयम आणि ब्रह्मचर्य ह्या त्या यज्ञाच्या देवता आहेत. खऱ्या वेदांमध्ये निर्दिष्ट हा यज्ञ जिनेंद्र भगवानांनी सांगितलेला आहे. याप्रकारचा यज्ञ चित्तनिरोध करून केल्याने परम निर्वाणाचे फळ देतो.

In the *Vedika* of our body, a fire of mind which is ignited with the clarified butter called as knowledge burns down wood of vices which sprouts from the tree of karma. Including Senses one should sacrifice animals like Anger, Pride, Guile, Greed, Attachment, Hatred and Ignorance. Truth, Forgiveness, Non-violence, A worthy donation, Right faith, Right Conduct, Restraint and *Brahmacarya* are the *Devatās*. This kind of *yajña* is stated by real Vedas, so said the *Jinendras*. He who does this kind of *yajña* with proper purification of mind and deeds, will get the fruit of ultimate *nirvāṇa*.

महावीरज्ञान



खामेमि सव्वे जीवा सव्वे जीवा खमंतु मे।
मित्ती मे सव्व भूएसु वेरं मज्झ ण केणइ॥

- वंदित्तुसुत्त ४९

Khāmemi Savve Jīvā Savve Jīvā Khamaṁtu Me /
Mittī Me Savva Bhūesu Veraṁ Majjha Ṇa Keṇai //

- Vaṁdittusutta 49

मी सर्व जीवांना क्षमा करतो, सर्व जीवांनी मला क्षमा करावी.
माझी मैत्री सर्व भूतमात्रांशी, वैर न माझे कोणाशी.

I forgive all the living beings and all the living beings should forgive me. I have friendship with all the beings and enmity with none.



